बुलडाणा, शुक्रवार,
दि.१३ नोव्हेंबर २०२६
» वर्ष ५, »
» अंक १०
» पृष्ठे ४, » किंमत २ रुपये

दैनिक
आपला विदर्भ

मुख्य संपादक -देविदास खनपटे मो.९७६७२३३०३४ aplavidarbhlivenews@gmail.com RNI.NO.MAHMAR/2023/88006

० बुलढाणा ० वाशिम ० यवतमाळ ० अमरावती ० वर्धा ० नागपूर ० गोंदीया ० भंडारा ० चंद्रपूर ० गडचिरोली ० छ.संभाजी नगर ० मुंबई

सुविचार

आयत्या मिळालेल्या संधीचे कधीच सोने करता येत नाही. मेहनतीने प्राप्त केलेल्या संधीचेच सोने होत असते.

थोडक्यात..महत्वाचे

टायगर श्रॉफ गोळीबार प्रकरण : पाच आरोपींची पोलीस कोठडी १६ नोव्हेंबरपर्यंत वाढवली

मुंबई / अभिनेता टायगर श्रॉफ याच्यावर झालेल्या गोळीबार प्रकरणात मकोका विशेष न्यायालयाने कथित शूटरसह पाच आरोपींच्या पोलीस कोठडीत १६ नोव्हेंबरपर्यंत वाढ केली आहे. बुधवारी न्यायालयाने हा निर्णय दिला. आरोपींची कोठडी वाढविण्याची मागणी करताना पोलिसांनी सांगितले की, त्यांची कुख्यात टोळीचा म्होरक्या अनिल पंडित याची जवळची नातेवाईक सुनेहा पंडित हिच्यासोबत समोरासमोर चौकशी करायची आहे. सुनेहा पंडित हिला १ नोव्हेंबर रोजी हरियाणातून अटक करण्यात आली असून, ती सध्या पोलीस कोठडीत आहे. दरम्यान, एका कथित शूटरच्या वयाबाबत तो अल्पवयीन असल्याचा दावा करण्यात आला आहे. यासंदर्भात वस्तुस्थितीची पडताळणी करण्यासाठी पोलिसांचे पथक हरियाणातील आरोपीच्या मूळ गावी पाठविण्यात आल्याची माहिती पोलिसांनी न्यायालयाला दिली.

रील बनवताना फोडले फटाके; आगीत चार एकर ऊस जळून खाक

नांदेड / सोशल मीडियासाठी रील तयार करण्याच्या नादात काही तरुणांनी फटाके फोडल्याने चार एकरांतील उसाचे पीक जळून खाक झाल्याची घटना नांदेड जिल्ह्यातील मरळक गावात घडली. मंगळवारी घडलेल्या या घटनेची माहिती पोलिसांनी बुधवारी दिली. लिंबगाव पोलीस ठाण्यात दाखल तक्रारीनुसार, काही तरुण सोशल मीडियासाठी व्हिडिओ तयार करण्याकरिता बाहेरून गावात आले होते. त्यांनी शेतकरी मानिकराव शिंदे यांच्या शेताजवळ फटाके फोडले. यावेळी फटाक्यांच्या ठिणग्या उसाच्या पिकावर पडल्याने आग लागली. काही वेळातच आगीने संपूर्ण शेतातील उसाला आपल्या कवेत घेतले. या आगीत शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. घटनेला जबाबदार असलेल्या तरुणांविरुद्ध कठोर पोलीस कारवाई करण्याची मागणी स्थानिक शेतकऱ्यांनी केली आहे. तसेच नुकसानग्रस्त शेतकरी मानिकराव शिंदे यांनी राज्य सरकारकडे योग्य नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

कुर्ल्यात भरदिवसा गोळीबार; ३३ वर्षीय विनोद पवारची हत्या

मुंबई / कुर्ला पश्चिम येथील माकडवाला कंपाउंड परिसरात जुन्या वैमनस्यातून बुधवारी भरदिवसा गोळीबार करून विनोद पवार (३३) याची हत्या करण्यात आली. दुपारी सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास तीन हल्लेखोरांनी विनोदवर पाच ते सहा गोळ्या झाडल्या. त्यानंतर हल्लेखोर घटनास्थळावरून फरार झाले. पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, या हत्येचे धागेदोरे टोळीयुद्धाशी संबंधित असण्याची शक्यता आहे. मृत विनोद पवार हा २०१९ मध्ये झालेल्या बिल्ला पवार हत्या प्रकरणातील आरोपी होता. विशेष म्हणजे, याच वर्षी २९ एप्रिल रोजी विनोदचा मोठा भाऊ बाबा पवार याचीही गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. त्यानंतर आता विनोदचीही हत्या झाल्याने परिसरात खळबळ उडाली असून, पोलीस हल्लेखोरांचा शोध घेत आहेत.

नेट, सेट व पीएचडीधारक १६ नोव्हेंबरला पुण्यात काढणार मोर्चा

मुंबई / राज्यातील नेट, सेट आणि पीएचडीधारक संघर्ष समितीने आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी १६ नोव्हेंबर रोजी पुणे येथील उच्च शिक्षण विभागाच्या संचालनालयावर मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. उच्चशिक्षित व पात्रताधारक प्राध्यापकांच्या विविध प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. समितीच्या म्हणण्यानुसार, राज्यातील अनेक उच्चशिक्षित व पात्रताधारक प्राध्यापकांना महाविद्यालयांमध्ये तासिका तत्त्वावर (क्लॉक अवर बेसिस) अत्यंत कमी मानधनावर अध्यापनाचे काम करावे लागत आहे. त्यामुळे यूजीसीच्या निर्देशांनुसार शैक्षणिक संस्थांमधील रिक्त असलेली ९० टक्क्यांपर्यंत पदे भरण्यात यावीत, तासिका तत्त्वावरील अध्यापन पद्धत बंद करावी आणि उर्वरित पदांवर कंत्राटी नियुक्त्या केल्यास संबंधित प्राध्यापकांना समान कामासाठी समान वेतन देण्यात यावे, अशी मागणी समितीने केली आहे. समितीशी संबंधित प्रा. सुरेश पाटील यांनी सांगितले की, राज्यातील प्राध्यापक भरती प्रक्रियेत अनेक अनियमितता होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. भरती प्रक्रियेतील भ्रष्टाचाराला पूर्णपणे आळा घालून नियुक्त्या पारदर्शक आणि निश्चित कालमर्यादेत करण्यात याव्यात, अशी समितीची प्रमुख मागणी आहे. याशिवाय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार प्राध्यापकांचे अध्यापन व शैक्षणिक कामकाजाचे स्वरूप आणि कार्यभार निश्चित करण्यासाठी स्पष्ट व न्याय्य शासन आदेश जारी करावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. या मोर्चात सहभागी होऊन उच्च शिक्षण विभागासमोर आपल्या मागण्या प्रभावीपणे मांडाव्यात, असे आवाहन नेट, सेट आणि पीएचडीधारक संघर्ष समितीने राज्यभरातील पात्रताधारक उमेदवारांना केले आहे.

भावाच्या लढ्याला बळ मिळो, बळीराजाच्या आयुष्यात सुखाचे दिवस येवोत!

रविकांत तुपकरांना बहिणीचा अनोखा आशीर्वाद!

भाऊबीजेला मोठ्या बहिणीने केले भावाचे औक्षण; मीनाताईंच्या आशीर्वादाने भावनिक क्षण

१४ नोव्हेंबरपासून दुष्काळ संघर्ष यात्रेला सुरुवात



बुलढाणा / प्रतिनिधी

भाऊबीज म्हणजे भाऊ-बहिणीच्या प्रेमाचा, जिव्हाळ्याचा आणि अतूट नात्याचा सण! मात्र, यंदाच्या भाऊबीजेला शेतकऱ्यांच्या संघर्षाची भावनिक किनार लाभली. लाखो शेतकऱ्यांच्या न्याय्य हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करणारे शेतकरी नेते तथा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक रविकांत तुपकर यांनी आपल्या मोठ्या बहीण मीनाताई गवते पाटील यांच्या घरी जाऊन भाऊबीज साजरी केली. यावेळी बहिणीने प्रेमाने भावाचे औक्षण केले आणि त्यांना आशीर्वाद दिले. मात्र, हा आशीर्वाद केवळ भावाच्या सुखसमृद्धीसाठी नव्हता, तर राज्यातील लाखो शेतकऱ्यांच्या सुखी आयुष्यासाठी आणि त्यांच्या संघर्षाला यश मिळण्यासाठी होता. 'शेतकऱ्यांच्या लढ्याला बळ मिळो, बळीचं राज्य येवो!' या भावपूर्ण शब्दांत मीनाताई गवते पाटील यांनी भावाला आशीर्वाद दिला. भावाच्या हातून शेतकऱ्यांची सेवा घडत राहावी, बळीराजाच्या न्याय्य हक्कांसाठी सुरू असलेल्या लढ्याला यश मिळावे आणि शेतकऱ्यांच्या आयुष्यात पुन्हा सुखाचे दिवस यावेत, अशी मनापासूनची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. सध्या राज्यातील शेतकरी दुष्काळाच्या संकटाशी झुंज देत आहे. पिकांचे नुकसान, घटलेले उत्पादन, कर्जाचा वाढता डोंगर आणि आर्थिक विवंचना यामुळे बळीराजा हवालदिल झाला आहे. अशा परिस्थितीत कर्जमाफी, पीकविमा, दुष्काळी मदत आणि सक्तीच्या कर्जवसुलीविरोधात रविकांत तुपकर सातत्याने आवाज उठवत आहेत. शेतकऱ्यांना न्याय मिळावा, त्यांच्या प्रश्नांची शासनदरबारी प्रभावीपणे दखल घेतली जावी, यासाठी त्यांचा संघर्ष सुरू आहे. याच संघर्षाचा पुढील टप्पा म्हणून १४ नोव्हेंबरपासून रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वाखाली दुष्काळ संघर्ष यात्रा सुरू होणार आहे. शेतकऱ्यांच्या व्यथा, मागण्या आणि प्रश्न शासनापर्यंत पोहोचवण्यासाठी ही यात्रा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अशा निर्णायक टप्प्यावर भाऊबीजेच्या दिवशी मोठ्या बहिणीकडून मिळालेला आशीर्वाद तुपकरांसाठी निश्चितच भावनिक बळ देणारा ठरला. एकीकडे लाखो शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणारे रविकांत तुपकर, तर दुसरीकडे मोठ्या बहिणीसमोर आशीर्वादासाठी नतमस्तक झालेले भाऊ... या प्रसंगातून त्यांच्या कौटुंबिक नात्यातील जिव्हाळा आणि शेतकऱ्यांविषयीची आस्था अधोरेखित झाली. भावाच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करताना बहिणीने लाखो शेतकऱ्यांच्या सुखाचीही मागणी केली. त्यामुळे यंदाची ही भाऊबीज केवळ कौटुंबिक सण न राहता बळीराजाच्या संघर्षाला समर्पित झालेला एक भावनिक क्षण ठरली!

अजितदादांच्या निधनानंतर विलिनीकरणाचा विषय संपला! माझ्याकडे कोणताही प्रस्ताव नाही : खासदार सुप्रिया सुळे

मुंबई / वृ.सं.

दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या विलिनीकरणाबाबत गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असताना खासदार सुप्रिया सुळे यांनी यावर आपली भूमिका स्पष्ट केली आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर दोन्ही पक्षांच्या विलिनीकरणासंदर्भात आपल्याकडे कोणताही प्रस्ताव आलेला नाही किंवा याबाबत कोणीही आपल्याशी चर्चा केलेली नाही, असे स्पष्ट विधान सुळे यांनी केले आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, अजित पवार हयात असताना दोन्ही पक्षांच्या विलिनीकरणासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले होते. या संदर्भात आपण यापूर्वीही बोललो आहोत. मात्र, दादांच्या निधनानंतर माझ्याकडे विलिनीकरणाचा कोणताही प्रस्ताव आलेला नाही. माझ्याशी याबाबत कोणीही बोललेले नाही. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या चर्चांना काहीही आधार नाही. शरद पवार यांची विविध राजकीय नेत्यांकडून भेट घेतली जात असल्याच्या चर्चांवर बोलताना सुळे म्हणाल्या की, पवार साहेबांना अनेक लोक भेटत असतात. त्यात नवीन किंवा वावगे काहीही नाही. अजित पवार यांचा गट वेगळा झाला होता, त्यावेळीही अनेक जण शरद पवार यांची भेट घेत होते. त्यांच्या पक्षात काय सुरू आहे, हा त्यांच्या पक्षाचा अंतर्गत विषय आहे. त्यावर आपण भाष्य करण्याचे कारण नाही. विलिनीकरणाच्या चर्चांबाबत भावनिक प्रतिक्रिया देताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, ज्या दिवशी माझा भाऊ गेला, त्यानंतर मी या विषयावर पडदा टाकला. माझा भाऊ गेला, त्याच वेळी हा विषय संपला. दादा होते तोपर्यंत या चर्चा सुरू होत्या. आम्ही काय करणार आहोत, हे संपूर्ण जगाला माहीत होते. मात्र, आता तो विषय संपला आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या विलिनीकरणासाठी पडद्यामागे हालचाली सुरू असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. अजित पवार गटातील काही आमदारांनी शरद पवार यांची भेट घेतल्यानंतर या चर्चांना अधिक वेग आला होता. राष्ट्रवादी



काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातील काही नेत्यांनीही सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील गटातील काही नेत्यांमध्ये अस्वस्थता असल्याचा दावा केला होता. दुसरीकडे, अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीही अलीकडेच विलिनीकरणाच्या चर्चांवर वेगवेगळी विधाने केली होती. त्यांच्या विधानांमुळे राजकीय वर्तुळात चर्चांना आणखी उधाण आले.

मराठा बांधवांसाठी हेल्पलाईन क्रमांक जारी: मनोज जरांगे यांनी केली सर्वात मोठी घोषणा

मुंबई / वृ.सं.



मराठा समाजाच्या प्रगतीसाठी, लेकरा बाळांचे भविष्यासाठी आणि एकजूट टिकून राहण्यासाठी आपण मराठा सेवक म्हणून काम करायचे आहे,' असंही मनोज जरांगे पाटील यांनी पुढे बोलताना म्हटलं आहे. मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरागे पाटील यांनी राज्यातील मराठा आणि कुणबी सेवकांसाठी हेल्पलाईन नंबर आज जारी केला आहे. मराठा समाजातील मुलांच्या भविष्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यात घर तिथे मराठा सेवक तयार झाला पाहिजे, याच उद्देशाने हा नंबर आपण दिलेला आहे. असं मनोज जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले आहे. 'आपण दसऱ्याच्या दिवशी मराठा समाजासाठी सांगितलं होतं की, प्रचंड मोठ्या समाजाच्या हितासाठी आणि समाजातील मुलांच्या भविष्यासाठी लढणारी टीम राज्याच्या कानाकोपऱ्यात घर तिथे मराठा सेवक झाला पाहिजे यासाठी आपण घोषणा केली होती आणि नंबर देऊ म्हटलं होते. त्या दृष्टीने आज आपण मराठा समाजातील सर्वच लोकांसाठी हा नंबर दिलेला आहे,' असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

'एसआयआर'वरुन महायुतीत जुंपली!

शिंदे गटाच्या नेत्याचा गंभीर आरोप; राजकारण तापलं

जळगाव / वृ.सं.

जळगाव जिल्ह्यातील भुसावळमध्ये एसआयआर प्रक्रियेवरून शिवसेना शिंदे गट आणि भाजपमध्ये राजकीय संघर्ष पेटला आहे. वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी अधिकाऱ्यांना हाताशी धरून असंख्य मतदारांच्या नावांवर हरकती घेण्याचा कट रचल्याचा आरोप शिवसेना शिंदे गटाचे अनिल चौधरी यांनी केला आहे. एसआयआर प्रक्रियेवरुन महायुतीमध्येच जोरदार जुंपल्याचे दिसत आहे. जळगावमध्ये शिवसेना शिंदे गटाचे नेते अनिल चौधरी यांनी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी अधिकाऱ्यांना हाताशी धरून असंख्य मतदारांच्या नावावर हरकती घेण्याचा कट रचल्याचा आरोप केला आहे. दुसरीकडे महायुतीमधील तीनही पक्ष हे एसआयआरसाठी स्वतःला मदत करण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र याबाबत भाजपवर आक्षेप नोंदवा असे एकनाथ शिंदे यांच्याकडून निर्देश आहेत का ? याबाबत पक्षश्रेष्ठींना कळवावे लागेल, असं वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी म्हटलं आहे. यामुळे जळगावचं राजकारण चांगलंच तापल्याचे दिसत आहे.जळगाव जिल्ह्यातील भुसावळमध्ये एसआयआर प्रक्रियेवरून शिवसेना शिंदे गट आणि भाजपमध्ये राजकीय संघर्ष पेटला आहे. वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी अधिकाऱ्यांना हाताशी धरून असंख्य मतदारांच्या नावांवर हरकती घेण्याचा कट रचल्याचा आरोप शिवसेना शिंदे गटाचे अनिल चौधरी यांनी केला आहे. इतकेच नव्हे, तर संजय सावकारे यांच्याकडून पालकमंत्रीपद काढून घेणे हा त्यांच्या राजकीय डिमोशनचा भाग असून, आगामी दोन महिन्यांत होणाऱ्या मंत्रिमंडळ विस्तारात त्यांचे मंत्रिपदही जाणार असल्याचा दावा चौधरी यांनी केला आहे. दरम्यान, अनिल चौधरी यांच्या आरोपांना वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. भाजपचे इतके वाईट दिवस आलेले नाहीत की, एका तडीपार व्यक्तीचा सल्ला घेऊन मंत्रिपद काढले जाईल, अशा शब्दांत सावकारे यांनी चौधरींवर निशाणा साधला. तसेच दोन दिवस शिवसेनेत न आलेल्या अनिल चौधरींची संपूर्ण शिवसेना आणि भाजपही



त्यांच्या घरची असल्यासारखी वक्तव्ये सुरू असल्याचा टोला त्यांनी लगावला. दुसरीकडे, अनिल चौधरी यांच्यासमवेत शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख हे उपस्थित होते त्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी एसआयआर बाबत भाजपावर आक्षेप घेण्याचे यांना निर्देश दिले का? असा प्रश्न उपस्थित करत याबाबत वरिष्ठ पातळीवर ही माहिती कळवणार असल्याचेही म्हटले आहे. त्यामुळे भुसावळमध्ये महायुतीतील दोन मित्रपक्षांमधील वाद आता चव्हाट्यावर येण्याची शक्यता आहे.

संपादकिय

दिपावली संपली, आता वेध शालेय परिक्षांचे

दिवाळीचा सण म्हटला की आनंद, उत्साह, फराळ, फटाक्यांची आतषबाजी, नवनवीन कपड्यांची खरेदी आणि नातेवाईकांच्या भेटीगाठी यांची रेलचेल असते. वर्षभर अभ्यासाच्या व्यापात गुंतलेल्या विद्यार्थ्यांना दिवाळीची सुट्टी म्हणजे मनसोक्त आनंद लुटण्याची एक पर्वणीच असते. मात्र, दिवाळीचा हा आनंददायी काळ आता संपला असून विद्यार्थ्यांचे लक्ष पुन्हा एकदा अभ्यासाकडे वळू लागले आहे. सुट्ट्यांचा विरंगुळा मागे पडताच विद्यार्थ्यांना आता आगामी परीक्षांचे वेध लागले आहेत. दिवाळीच्या सुट्टीत अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबीयांसोबत वेळ घालवला, मित्रांसोबत फिरण्याचा आनंद घेतला, तर काहींनी गावाकडील नातेवाईकांच्या भेटीगाठी घेतल्या. दिवाळीच्या फराळाचा आस्वाद, आकाशकंदील, पणत्या, रांगोळ्या आणि सणासुदीच्या उत्साहात काही दिवस कसे निघून गेले, हे विद्यार्थ्यांनाही कळले नाही. मात्र, आता सुट्ट्या संपल्याने पुन्हा शाळा-महाविद्यालयांचे वातावरण अभ्यासमय होणार आहे. दिवाळीनंतर विद्यार्थ्यांसमोर सर्वात मोठे आव्हान असते ते म्हणजे पुन्हा अभ्यासाची लय पकडण्याचे. सुट्टीच्या काळात अभ्यासापासून काहीसे दूर गेलेल्या विद्यार्थ्यांना आता पुस्तकांची पाने उघडण्याची वेळ आली आहे. काही विद्यार्थ्यांनी सुट्टीतच अभ्यासाचे नियोजन केले असून, राहिलेला अभ्यास पूर्ण करण्यावर भर दिला आहे. तर काही विद्यार्थ्यांनी आता नव्याने अभ्यासाचे वेळापत्रक तयार करण्यास सुरुवात केली आहे. विशेषतः दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी आगामी काळ अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. बोर्डाच्या परीक्षांचे दिवस जवळ येत असल्याने या विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाची धावपळ सुरू झाली आहे. अभ्यासक्रम पूर्ण करणे, कठीण विषयांचा सराव करणे, मागील वर्षांच्या प्रश्नपत्रिका सोडवणे आणि लेखनाचा सराव करणे याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष केंद्रित होत आहे. दिवाळी संपल्यानंतर पालकांचीही भूमिका महत्त्वाची ठरते. मुलांनी सुट्टीत आनंद घेतला, आता त्यांनी अभ्यासाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा पालकांकडून व्यक्त होत आहे. अनेक पालक आपल्या पाल्यांच्या अभ्यासाचे नियोजन, शाळेतील उपस्थिती आणि अभ्यासातील प्रगती याकडे लक्ष देत आहेत. मात्र, केवळ अभ्यासासाठी दबाव न आणता मुलांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या अडचणी समजून घेणेही तितकेच आवश्यक आहे. आजच्या डिजिटल युगात मोबाईल, समाजमाध्यमे, खेळ आणि विविध मनोरंजनाच्या साधनांमध्ये विद्यार्थ्यांचा बराच वेळ जातो. दिवाळीच्या सुट्टीत वाढलेला मनोरंजनाचा वेळ आता कमी करून अभ्यासासाठी नियमित वेळ देणे गरजेचे आहे. अभ्यास करताना एकाग्रता राखणे, पुरेशी झोप घेणे, योग्य आहार घेणे आणि थोडा वेळ खेळासाठी राखून ठेवणे यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाचा ताण न घेता तयारी करता येऊ शकते. सुट्टीनंतर शाळा-महाविद्यालये सुरू झाल्यावर शिक्षकांकडूनही अभ्यासक्रम पूर्ण करण्यासोबतच परीक्षेच्या दृष्टीने विशेष मार्गदर्शन केले जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन, सराव परीक्षा, घटकनिहाय उजळणी आणि लेखन कौशल्य यावर भर दिला जाण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांनीही शिक्षकांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेऊन अभ्यासातील सातत्य कायम ठेवणे आवश्यक आहे. परीक्षा म्हटली की विद्यार्थ्यांच्या मनात काही प्रमाणात भीती आणि चिंता निर्माण होणे स्वाभाविक आहे. मात्र, परीक्षेकडे केवळ गुण मिळविण्याचे साधन म्हणून न पाहता वर्षभर केलेल्या अभ्यासाचे मूल्यमापन म्हणून पाहणे गरजेचे आहे. नियमित अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन, सातत्यपूर्ण उजळणी आणि आत्मविश्वास या चार गोष्टी विद्यार्थ्यांच्या यशाचा पाया ठरू शकतात. दिवाळीच्या सुट्टीतील आनंददायी आठवणी मनात साठवून आता विद्यार्थ्यांनी नव्या जोमाने अभ्यासाला सुरुवात करण्याची वेळ आली आहे. सणाचा उत्साह संपला असला तरी उज्ज्वल भवितव्य घडविण्याची संधी विद्यार्थ्यांसमोर उभी आहे. दिवाळीच्या प्रकाशाप्रमाणेच ज्ञानाचा प्रकाश आपल्या आयुष्यात पसरविण्यासाठी विद्यार्थ्यांनी मेहनत, जिद्द आणि चिकाटीने पुढे जावे. कारण आता फटाक्यांच्या आतषबाजीची जागा अभ्यासाच्या तयारीने घेतली असून, विद्यार्थ्यांच्या मनात एकच ध्यास आहे... परीक्षेत यश मिळवायचे आणि आपल्या मेहनतीचे सोने करायचे!

एमएसएमई उद्योजकांसाठी भारतीय डाक विभागाची पार्सल सेवा ठरतेय वरदान !

वाजवी दरात देशभरासह परदेशातही उत्पादने पोहोचविण्याची संधी



बुलढाणा / प्रतिनिधी

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजक (एमएसएमई), महिला बचत गट तसेच ई-कॉमर्स व्यावसायिकांना आपल्या उत्पादनांची विक्री देशभरात आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत करण्याची संधी भारतीय डाक विभागाच्या आधुनिक पार्सल सेवेमुळे उपलब्ध झाली आहे. वाजवी दर, विश्वासार्ह सेवा आणि देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेले व्यापक वितरण जाळे यामुळे उद्योजकांसाठी डाक विभागाची पार्सल सेवा प्रभावी वाहतूक व वितरणाचे माध्यम ठरत आहे. स्थानिक स्तरावर उत्पादित होणाऱ्या वस्तूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने भारतीय डाक विभागाने पार्सल सेवांचे आधुनिकीकरण केले आहे. यामध्ये ऑनलाइन ग्राहक सेवा, पार्सल ट्रॅकिंग, कॅश ऑन डिलिव्हरी, पॅकेजिंग आणि व्यावसायिक ग्राहकांसाठी पार्सल संकलन अशा विविध सुविधांचा समावेश आहे. आधुनिक पार्सल सेवांमुळे व्यवसायाला नवी दिशा : डाक विभागाच्या पार्सल सेवेमध्ये २४ तास ऑनलाइन ग्राहक सेवा केंद्र, Track & Trace सुविधेद्वारे पार्सलच्या प्रवासाची माहिती, Cash on Delivery (COD) द्वारे वस्तू मिळाल्यानंतर पैसे देण्याची सुविधा उपलब्ध आहे. याशिवाय सुरक्षित पार्सल पॅकेजिंग, व्यावसायिक ग्राहकांच्या ठिकाणाहून पार्सल संकलन (Pick-up Facility), मोठ्या प्रमाणातील मेल व पार्सल प्रक्रियेसाठी Business Post Centre आणि करारबद्ध व्यावसायिक ग्राहकांसाठी वाजवी दर अशा सुविधा देण्यात येतात. तसेच 'डाकघर निर्यात केंद्रा'च्या माध्यमातून निर्यातीसाठीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. महिला बचत गट आणि ग्रामीण उद्योजकांसाठी विशेष संधी : महिला बचत गटांनी तयार केलेले गृहउद्योगातील खाद्यपदार्थ, हस्तकला वस्तू, घरगुती उत्पादने तसेच ग्रामीण भागातील लघुउद्योजकांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना देशव्यापी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी ही सेवा उपयुक्त ठरत आहे. स्थानिक उत्पादनांना मोठी बाजारपेठ उपलब्ध झाल्याने ग्रामीण उद्योजकांच्या व्यवसायवृद्धीला आणि आर्थिक प्रगतीला चालना मिळू शकते. ई-कॉमर्स क्षेत्रातील व्यावसायिकांनाही डाक विभागाच्या व्यापक वितरण व्यवस्थेचा लाभ घेता येणार आहे. शहरांपासून दुर्गम ग्रामीण भागापर्यंत ग्राहकांच्या घरापर्यंत उत्पादने पोहोचविण्याची क्षमता हे या सेवेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. लघुउद्योजक, महिला बचत गट आणि ई-कॉमर्स व्यावसायिकांनी आपल्या उत्पादनांना देशव्यापी तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्यासाठी भारतीय डाक विभागाच्या आधुनिक पार्सल सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन बुलढाणा डाक विभागाचे अधीक्षक गजेंद्र नारायणराव जाधव यांनी केले आहे. इच्छुक उद्योजकांनी जवळच्या पोस्ट ऑफिसशी संपर्क साधावा किंवा बुलढाणा डाक विभागाच्या मार्केटिंग टीमशी संपर्क साधून व्यवसायासाठी उपलब्ध असलेल्या पार्सल सेवा, सुविधा व दरांची माहिती घ्यावी. मार्केटिंग टीमचे संपर्क क्रमांक : महेश चवंड – मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह, बुलढाणा प्रधान डाकघर (८६०५१९४६४०), शेख शब्बीर शेख बुडण – मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह, खामगाव प्रधान डाकघर (९७६७२१७८७९), आर. व्ही. पोफळे – मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह, चिखली उपडाकघर (९४२१६६१६८२), अतुल चिकाटे – मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह, अधीक्षक डाकघर, बुलढाणा (८७८८९००५८१).

'माझे गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियान प्रभावीपणे राबवा : मुख्य कार्यकारी अधिकारी भालचंद्र चव्हाण

बुलढाणा / प्रतिनिधी

गावागावांत आरोग्य, स्वच्छता, पोषण, पर्यावरण संवर्धन आणि नागरिकांच्या आरोग्यविषयक सवयींमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत 'माझे गाव – आरोग्यसंपन्न गाव' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाची जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी प्रभावीपणे अंमलबजावणी करून गावांना आरोग्यदृष्ट्या सक्षम बनवावे, असे आवाहन जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी भालचंद्र चव्हाण यांनी केले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील एकूण ८७० ग्रामपंचायतींनी या अभियानात सहभाग नोंदविला आहे. अभियानांतर्गत शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार विविध आरोग्यविषयक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासोबतच त्यांचा नियमित आढावा घेण्याच्या सूचना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले यांनी आरोग्य यंत्रणेला दिल्या आहेत. स्वच्छता, पाणी संवर्धन आणि पर्यावरण संवर्धनावर भर : अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक गावात सुरक्षित व शुद्ध पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, पाणी गुणवत्ता तपासणी, पाण्याचे शुद्धीकरण, वृक्षारोपण, धूरमुक्त गाव, कचरा संकलन व वर्गीकरण, सांडपाणी व्यवस्थापन, गावाची स्वच्छता आणि जलसंवर्धन यांसारख्या उपक्रमांना प्राधान्य देण्यात येणार आहे. लोकसहभागातून गावाचे पर्यावरण स्वच्छ व आरोग्यदायी ठेवण्यावर विशेष भर राहणार आहे. माता-बाल आरोग्य आणि कुपोषण निर्मूलनाला प्राधान्य : माता व बालमृत्यू रोखणे, बालकांचे संपूर्ण लसीकरण, तीव्र व मध्यम तीव्र कुपोषित बालकांचे योग्य व्यवस्थापन, गर्भवती महिलांची नियमित आरोग्य तपासणी आणि संस्थात्मक प्रसूतीला प्रोत्साहन देण्यात येणार आहे. माता व बाल आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आरोग्य यंत्रणेमार्फत विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. असंसर्गजन्य आजारांच्या तपासणीवर विशेष लक्ष : गावातील नागरिकांची उच्च रक्तदाब, मधुमेह व कर्करोग यांसारख्या असंसर्गजन्य आजारांसाठी तपासणी करण्यात येणार आहे. यासोबतच क्षयरोग व कुष्ठ रोग नियंत्रण, मानसिक आरोग्य, ज्येष्ठ नागरिकांची आरोग्यसेवा, दिव्यांगांसाठी आरोग्य सुविधा, किशोरवयीन आरोग्य आणि आयुष्मान आरोग्य मंदिरांच्या माध्यमातून सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. आरोग्यविषयक जनजागृती, नियमित आरोग्य शिबिरे, लोकसहभागातून स्वच्छता उपक्रम आणि आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रसार करून नागरिकांमध्ये प्रतिबंधात्मक आरोग्यविषयक जाणीव निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. उत्कृष्ट ग्रामपंचायतींना कोट्यवधींची पुरस्कार रक्कम : अभियानांतर्गत विविध आरोग्य व विकास निर्देशांकांच्या आधारे ग्रामपंचायतींचे मूल्यांकन करण्यात येणार आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना राज्य व जिल्हास्तरावर पुरस्कार देण्यात येणार आहेत. राज्यस्तरावर प्रथम क्रमांकासाठी ५ कोटी रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ३ कोटी रुपये आणि तृतीय क्रमांकासाठी २ कोटी रुपये पुरस्कार देण्यात येणार आहेत. तर जिल्हास्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे २५ लाख, २० लाख आणि १५ लाख रुपयांचे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. सामूहिक सहभागातून गावांचे आरोग्य उंचावणार : या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आरोग्य यंत्रणा, ग्रामसेवक, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा सेविका, अंगणवाडी सेविका आणि ग्रामस्थांनी समन्वयाने काम करणे आवश्यक आहे. प्रत्येक गावाने आरोग्यविषयक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवून आपले गाव स्वच्छ, निरोगी व आरोग्यसंपन्न बनविण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी भालचंद्र चव्हाण यांनी केले आहे.

अवैध सावकारीच्या संशयावरून सहकार विभागाची धडक कारवाई! सुंदरखेडमध्ये छापा

बुलढाणा / प्रतिनिधी

अवैध सावकारीच्या माध्यमातून आर्थिक व्यवहार करून नागरिकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारींची दखल घेत सहकार विभागाने बुलढाण्यात कारवाईचा बडगा उगारला आहे. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम १६ अन्वये सुंदरखेड परिसरात सहकार विभागाच्या विशेष पथकाने ६ नोव्हेंबर रोजी छापा टाकून महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली. सुंदरखेड येथील सम्यक नगर परिसरातील सौ. दीक्षा शशिकांत गवई यांनी मौळी पार्क, खामगाव रोड, सुंदरखेड येथील रेखा मनोज पवार यांच्याविरुद्ध अवैध सावकारीसंदर्भात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीची दखल घेत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा डॉ. महेंद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाची नियुक्ती करण्यात आली होती. सहाय्यक निबंधक (प्रशासन) स्वरूपा धुमाळ यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथकाने संबंधित ठिकाणी तपासणी केली. यावेळी आर्थिक व्यवहारांशी संबंधित कोरे धनादेश, पैशांच्या देवाणघेवाणीचे करारनामे, व्यवहारांच्या नोंदी असलेल्या वह्या तसेच अन्य महत्त्वाची कागदपत्रे आढळून आली. संशयास्पद सावकारी व्यवहारांशी संबंधित असल्याच्या कारणावरून ही सर्व कागदपत्रे पथकाने जप्त केली. या पथकामध्ये सहकार अधिकारी यू. के. सुरडकर, योगेश धुसरकर, के. डी. शोलके, ए. ए. बारी, निलेश सोनुने आणि अक्षय परिहार यांचा समावेश होता. जप्त करण्यात आलेल्या कागदपत्रांची सध्या तपासणी सुरू असून, त्यातील आर्थिक व्यवहारांचे स्वरूप, पैशांच्या देवाणघेवाणीचा तपशील आणि तक्रारीतील आरोपांशी त्यांचा संबंध याची पडताळणी केली जाणार आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात अमरावती विभागात सावळी ग्रामपंचायत प्रथम; एक कोटी रुपयांचे विकास पारितोषिक जाहीर

बुलढाणा / प्रतिनिधी


मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान सन २०२५-२६ अंतर्गत अमरावती विभागात उत्कृष्ट कामगिरी करत बुलढाणा जिल्ह्यातील धाड परिसरातील सावळी ग्रामपंचायतीने प्रथम क्रमांक पटकावला आहे. या ऐतिहासिक यशाबद्दल ग्रामपंचायतीला एक कोटी रुपयांचे घसघशीत विकास पारितोषिक जाहीर झाले असून, या कामगिरीमुळे संपूर्ण जिल्ह्यासह धाड परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. सावळी ग्रामपंचायतीच्या या अभूतपूर्व यशामागे गावचे आदर्श सरपंच डॉ. तेजराव नरवाडे यांचे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन आणि खंबीर नेतृत्व लाभले. त्यांच्या विकासाभिमुख कार्यपद्धतीमुळे गावातील पाणीपुरवठा, स्वच्छता, शिक्षण, आरोग्य आणि मूलभूत सुविधांच्या क्षेत्रात उल्लेखनीय परिवर्तन घडून आले आहे. याशिवाय सावळीचे सुपुत्र तथा सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) आणि आयएएस अधिकारी विशाल नरवाडे यांचेही गावाला मोलाचे मार्गदर्शन लाभले. प्रशासकीय यंत्रणा आणि ग्रामस्थांच्या लोकसहभागाचा प्रभावी समन्वय या यशाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले. या यशासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व प्रशासकीय अधिकारी, बुलढाणा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, उपसरपंच प्रवीण वाघ, ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, ग्रामविकास अधिकारी विनायक पंडित, आरोग्य व शिक्षण विभाग, महिला बचत गट तसेच सावळी ग्रामस्थांनी एकजुटीने योगदान दिले. लोकसहभाग, नियोजनबद्ध विकासकामे आणि प्रशासकीय समन्वयाच्या बळावर सावळी ग्रामपंचायतीने मिळवलेले हे यश संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरले आहे. एक कोटी रुपयांच्या विकास पारितोषिकामुळे गावाच्या विकासाला आणखी गती मिळणार असून, सावळी ग्रामपंचायतीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.



DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

अमेरिका : व्हाइट हाऊसजवळ जिममध्ये घुसून थेट गोळीबार, एकाचा मृत्यू, ४ जखमी



काही दिवसांआधीच घडलेली घटना

काही दिवसांआधीच घडलेली घटना
अमेरिकेतील मेने राज्यातील लेव्हिस्टन शहरात २६ ऑक्टोबर २०२३ रोजी अंधाधुंद गोळीबाराची घटना घडली होती. या हल्ल्यात २२ जणांचा मृत्यू झाला होता, तर डझनभर नागरिक जखमी झाले होते. तीन ठिकाणी गोळीबार करणारे हल्लेखोर फरार झाले होते. त्यामुळे पोलिसांनी नागरिकांना घरातच राहण्याचे आवाहन केले होते.

वॉशिंग्टन / वृ.सं.
अमेरिकेतून एक मोठी बातमी समोर आली आहे. अमेरिकेची राजधानी वॉशिंग्टन डीसीमध्ये व्हाइट हाऊसजवळील लॉगन सर्कल परिसरात गोळीबाराची घटना घडली. गोळीबाराची सुरुवात एका फिटनेस सेंटरमध्ये झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर हल्लेखोराने बाहेरही गोळीबार केला. या घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून अन्य ४ जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी एकाची प्रकृती गंभीर असून इतर तिघांना किरकोळ दुखापती झाल्या आहेत. या घटनेनंतर परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. गोळीबारानंतर हल्लेखोर जवळच्या इमारतीत लपून बसला असल्याची माहिती पोलिसांना मिळाली आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार एक बंदुकधारी व्यक्ती आधी जिममध्ये शिरला. त्याने नंतर एकावर गोळ्या झाडल्या आणि नंतर बाहेर पडला. संशयिताने बाहेर पडून रस्त्यावरही गोळीबार केल्याची माहिती समोर आली आहे. त्यावेळी गोळीबाराचा आवाज ऐकू आला. या घटनेनंतर पोलिसांनी संपूर्ण परिसराची नाकेबंदी केली असून जवळच्या शाळांमध्ये लॉकडाऊन लागू करण्यात आले. एनबीसी न्यूजने याबद्दलचं वृत्त दिलं आहे. घटनेच्या वेळी जिममध्ये ट्रेडमिलवर व्यायाम करणाऱ्या एका महिलेने हा थरार सांगितला. तिने गोळी लागलेली व्यक्ती इमारतीबाहेर पळताना पाहिली. परिस्थिती इतकी भीषण होती की, बाहेर पडण्यासाठी त्या जखमी व्यक्तीला गोळीबार झालेल्या ठिकाणावरूनच जावे लागले, असे तिने सांगितले. पोलिसांनी १५ वी आणि पी स्ट्रीट्स एनडब्ल्यू परिसरात अनेकांना गोळ्या लागून जखमी झाल्याच्या या वृत्ताला दुजोरा दिला आहे. चार जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाहीये. दरम्यान, संशयिताला सुरक्षा यंत्रणांनी घेरल्याची माहिती आहे. पोलिसांनी नागरिकांना १५०० ब्लॉक परिसरात जाणे टाळण्याचे आवाहन केले आहे. जवळील शाळा, रस्ते आणि इमारतींना सुरक्षेच्या कारणास्तव बंद करण्यात आले. अमेरिकेच्या फेडरल ब्युरो ऑफ अल्कोहोल, टोबॅको, फायरआर्म्स अँड एक्सप्लोसिव्हजनेही घटनास्थळी मदतीसाठी आपले एजंट पाठवले आहेत.

डिसेंबरअखेर 'टॉमस' चक्रीवादळाचा धोका?

ताशी १८४ किमी वेगाने वारे वाहण्याची शक्यता

कोलकाता / वृ.सं.
बंगालच्या उपसागरात १३ नोव्हेंबरच्या आसपास कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याची शक्यता असून, त्यामुळे दक्षिण भारतातील काही राज्यांमध्ये पावसाचा जोर वाढू शकतो. दरम्यान, डिसेंबर महिन्याच्या अखेरीस 'टॉमस' नावाचे संभाव्य चक्रीवादळ तयार होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या वादळाची तीव्रता वाढल्यास ताशी १८४ किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हवामानाच्या अनुकूल परिस्थितीत हे चक्रीवादळ अधिक शक्तिशाली होऊ शकते. त्याचा परिणाम समुद्रासह किनारपट्टीवरील मानवी वस्त्यांवरही होण्याची शक्यता आहे. या काळात मुसळधार पाऊस आणि सोसाट्याचे वारे यामुळे जनजीवन विस्कळीत होण्याबरोबरच मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. डिसेंबरअखेर संभाव्य असलेल्या या चक्रीवादळाचे 'टॉमस' असे नाव निश्चित करण्यात आल्याचे वृत्त आहे. विशेषतः फिलिपिन्समधील उत्तर लुझोन आणि पूर्व किनारपट्टीवरील बेटांना या वादळाचा फटका बसण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे संबंधित किनारपट्टी भागांतील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या चक्रीवादळाची नेमकी निर्मिती आणि जमिनीवर धडकण्याची तारीख अद्याप निश्चित झालेली नाही. मात्र, डिसेंबरचा शेवटचा आठवडा संभाव्य कालावधी मानला जात आहे. चक्रीवादळाचा प्रभाव त्याची तीव्रता, दिशा आणि समुद्रावरील परिस्थितीवर अवलंबून असतो. हवामानशास्त्रीय अंदाजानुसार, हे वादळ निरीक्षण क्षेत्रात प्रवेश करून जमिनीच्या दिशेने सरकल्यास किनारपट्टीवरील भागांवर त्याचा थेट परिणाम एक ते चार दिवस राहू शकतो. तर किनारपट्टीवर धडक झाल्यास सोसाट्याचे वारे आणि मुसळधार पावसाचा धोकादायक टप्पा दोन ते तीन दिवस टिकण्याची शक्यता आहे. मात्र, चक्रीवादळाची निर्मिती, त्याचा मार्ग आणि तीव्रता याबाबत अधिकृत हवामान विभागाकडून पुढील अद्ययावत माहिती मिळाल्यानंतरच परिस्थिती स्पष्ट होणार आहे.



मजबूत देशांतर्गत मागणी आणि खासगी गुंतवणुकीमुळे अर्थव्यवस्थेला गती; विकासदराचा अंदाज ६.५ वरून ७ टक्क्यांवर

भारताचा आर्थिक विकास दर ७ टक्क्यांवर जाणार; मूडीजचा अंदाज



नवी दिल्ली / वृ.सं.
भारतीय अर्थव्यवस्था वेगाने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असून, चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये देशाचा आर्थिक विकास दर ७ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज जागतिक पतमानांकन संस्था मूडीजने व्यक्त केला आहे. यापूर्वी हा अंदाज ६.५ टक्के होता. देशातील व्यापक आर्थिक घडामोडींना मिळणारी गती आणि ऊर्जा पुरवठ्यातील आव्हानांचा सामना करण्याची भारताची क्षमता लक्षात घेऊन मूडीजने विकासदराच्या अंदाजात वाढ केली आहे. मूडीजच्या 'ग्लोबल मॅक्रो आउटलूक'अहवालानुसार,मजबूत देशांतर्गत मागणी, सुधारत असलेली गुंतवणुकीची स्थिती आणि अर्थव्यवस्थेचा भक्कम पाया यामुळे भारताला मध्यम कालावधीत ७ टक्के विकासदर कायम राखणे शक्य आहे. भांडवली वस्तूंच्या उत्पादनातील वाढ, औद्योगिक क्षेत्राला मिळणारे वाढते कर्ज आणि उत्पादन क्षमतेचा वाढता वापर यामुळे खासगी गुंतवणुकीला चालना मिळत असल्याचे संकेत आहेत. दरम्यान, देशासमोर काही आर्थिक आव्हानेही कायम आहेत. महागाईचा वाढता दबाव आणि भारतीय रिझर्व्ह बँकेच्या कठोर पतधोरणामुळे व्याजदर वाढण्याची शक्यता आहे. याचा परिणाम गुंतवणुकीच्या वेगावर होऊ शकतो. तसेच मान्सूनमधील अनिश्चिततेमुळे ग्रामीण भागातील मागणीवरही परिणाम होण्याची शक्यता मूडीजने व्यक्त केली आहे. जागतिक ऊर्जा बाजारातील अस्थिरता आणि कच्च्या तेलाच्या किमतींमधील चढ-उतार असतानाही भारताने या आव्हानांचा प्रभावीपणे सामना केला आहे. तेल आयातीसाठी विविध स्रोतांचा वापर, देशांतर्गत तेलशुद्धीकरण क्षमता आणि सरकारच्या उपाययोजनांमुळे ग्राहकांना आंतरराष्ट्रीय बाजारातील दरवाढीचा थेट फटका कमी बसला आहे. वस्तू व सेवा कराचे (जीएसटी) उत्पन्न, वाहन विक्री आणि निर्यातीतील वाढ यांसारख्या आर्थिक निर्देशांकांमधून देशांतर्गत आर्थिक व्यवहारांना चांगली गती मिळत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे जागतिक आर्थिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवरही भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ कायम राहण्याची शक्यता मूडीजने व्यक्त केली आहे.

मुद्रा कर्जाला आणखी पाच वर्षांचे सुरक्षा कवच!

मार्च २०३१ पर्यंत कर्ज हमी योजना सुरू राहणार; केंद्र सरकारकडून ५ हजार कोटींच्या निधीला मंजुरी

नवी दिल्ली / वृ.सं.
लघुउद्योजक, छोटे व्यावसायिक आणि सूक्ष्म उद्योगांना आर्थिक आधार देणाऱ्या प्रधानमंत्री मुद्रा योजनेला केंद्र सरकारने आणखी पाच वर्षांची मुदतवाढ दिली आहे. या योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या कर्जासाठीचे हमी कवच आता मार्च २०३१ पर्यंत कायम राहणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. सूक्ष्म उद्योगांसाठीच्या ऋण हमी निधी (सीजीएफएमयू) अंतर्गत पाच हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या निधीच्या माध्यमातून मुद्रा योजनेअंतर्गत सुमारे १२.६ लाख कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून देण्यास मदत होणार आहे. जानेवारी २०१६ मध्ये सुरू झालेल्या प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत आतापर्यंत ६०.३६ कोटींपेक्षा अधिक कर्जांना मंजुरी देण्यात आली असून, त्यांचे एकूण मूल्य ४३.३४ लाख कोटी रुपये आहे. या योजनेमुळे छोट्या व्यावसायिकांना आणि नवउद्योजकांना विनातारण कर्ज मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे. कर्जदारांकडून कर्जाची परतफेड न झाल्यास वित्तीय संस्थांना होणाऱ्या संभाव्य नुकसानीपासून संरक्षण देण्याचे काम या हमी निधीद्वारे केले जाते. कंपनीमार्फत हे संरक्षण राष्ट्रीय ऋण हमी विश्वस्त उपलब्ध करून दिले जाते.



मुदतवाढीमुळे सूक्ष्म उद्योगांना दिलासा
केंद्र सरकारच्या या निर्णयामुळे सूक्ष्म उद्योग आणि छोट्या व्यावसायिकांना कर्जपुरवठ्याचे सातत्य मिळणार आहे. तसेच नव्या उद्योगांना सुरुवात करण्यासाठी आणि विद्यमान व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी आर्थिक मदत उपलब्ध होण्यास चालना मिळणार आहे. मार्च २०३१ पर्यंत हमी कवच कायम राहणार असल्याने मुद्रा योजनेच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती आणि उद्योजकतेला प्रोत्साहन मिळण्याची अपेक्षा आहे.

हान कांग यांना नोबेल पुरस्कार मिळाल्यानंतर वाचनसंस्कृतीला चालना

रीलसच्या व्यसनातून मुक्त होण्यासाठी दक्षिण कोरियातील तरुणांचा पुस्तकांकडे कल!

सोल / वृ.सं.
मोबाईलवरील रील्स आणि शॉर्ट व्हिडिओ पाहण्याच्या वाढत्या सवयीमुळे तरुणांमध्ये वाचनाची आवड कमी होत असल्याची चर्चा असताना दक्षिण कोरियातून मात्र सकारात्मक चित्र समोर येत आहे. इंटरनेट आणि डिजिटल माध्यमांच्या वातावरणात वाढलेली नवी पिढी आता मोबाईलवरील शॉर्ट व्हिडिओंच्या सवयीपासून दूर जाण्यासाठी पुन्हा पुस्तकांकडे वळत आहे. विशेष म्हणजे, पुस्तक वाचन ही केवळ ज्ञान मिळविण्याची सवय न राहता मित्रांसोबत वेळ घालविण्याचे, स्वतःची आवड व्यक्त करण्याचे आणि जीवनशैलीचा भाग बनण्याचे माध्यम ठरत आहे. दक्षिण कोरियातील २६ वर्षीय ली युनजी यांनी मोबाईलवर शॉर्ट व्हिडिओ पाहण्याची सवय लागल्याचे सांगितले. या सवयीवर नियंत्रण मिळविण्यासाठी त्या आता डायरी लिहिणे आणि पुस्तके वाचण्याचा पर्याय स्वीकारत आहेत. त्यांच्याप्रमाणेच अनेक तरुण डिजिटल माध्यमांपासून काही काळ दूर राहून वाचनाकडे वळत असल्याचे दिसून येत आहे. या बदलाला ऑक्टोबर २०२४ मध्ये महत्त्वाची चालना मिळाली. दक्षिण कोरियाच्या लेखिका हान कांग यांना साहित्यातील नोबेल पुरस्कार जाहीर झाला. हा पुरस्कार मिळविणाऱ्या त्या पहिल्या दक्षिण कोरियन आणि पहिल्या आशियाई महिला ठरल्या. त्यांच्या यशानंतर पुस्तकांच्या दुकानांमध्ये वाचकांची गर्दी वाढली. देशातील सर्वात मोठ्या क्योबो पुस्तक विक्री साखळीच्या सर्वोच्च दहा पुस्तकांच्या यादीत पुरस्कार जाहीर झाल्यानंतरच्या आठवड्यात हान कांग यांच्या नऊ पुस्तकांचा समावेश झाला होता. एका ऑनलाइन पुस्तक विक्री कंपनीच्या आकडेवारीनुसार, २०२६ च्या पहिल्या तिमाहीत किशोरवयीन आणि २० वर्षांच्या तरुणांमध्ये कथा, कविता आणि नाटकांच्या पुस्तकांच्या खरेदीत मागील वर्षाच्या तुलनेत १३.६ टक्क्यांनी वाढ झाली आहे. दरम्यान, दक्षिण कोरियाच्या सांस्कृतिक आणि क्रीडा मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, २०२५ मध्ये केवळ ३८.५ टक्के प्रौढांनी मागील वर्षात किमान एक पुस्तक वाचल्याचे सांगितले. या आकडेवारीत ई-पुस्तके आणि ऑडिओबुकचाही समावेश आहे. एकूणच वाचनाचे प्रमाण घटले असले, तरी २० ते २९ वयोगटातील तरुणांमध्ये वाचनाची आवड वाढल्याचे सकारात्मक चित्र आहे. या वयोगटातील पुस्तक वाचणाऱ्यांचे प्रमाण २०२३ मधील ७४.५ टक्क्यांवरून वाढून ७५.३ टक्क्यांवर पोहोचले आहे.

जेन-झीच्या वाढत्या संपत्तीमुळे श्रीमंत देशांमध्ये ज्येष्ठांचे आर्थिक वर्चस्व कमी!

२६ देशांमध्ये वृद्धांच्या उत्पन्नात घट; तरुणांना चांगल्या नोकऱ्या आणि आर्थिक संधी

न्यूयॉर्क / वृ.सं.
जगातील अनेक श्रीमंत देशांमध्ये ज्येष्ठ नागरिकांची आर्थिक स्थिती तुलनेने कमकुवत होत असल्याचे चित्र समोर आले आहे. ३२ देशांमधील आकडेवारीनुसार, त्यापैकी २६ देशांमध्ये ज्येष्ठ नागरिकांचे उत्पन्न जेन-झी आणि कामकाजी वयोगटातील नागरिकांच्या तुलनेत घटत आहे. दुसरीकडे, तरुण पिढीची कमाई आणि संपत्ती वाढत असल्याने आर्थिक क्षेत्रातील पिढ्यांमधील अंतर बदलत आहे. अमेरिकेतील मिलेनियल्स (१९८० च्या सुरुवातीपासून १९९० च्या मध्यापर्यंत जन्मलेली पिढी) यांनी आपल्या वयात देशाच्या इतिहासातील मागील कोणत्याही पिढीपेक्षा अधिक संपत्ती जमा केली आहे. सुरुवातीच्या संकेतांनुसार, जेन-झी पिढीही त्यापेक्षा वेगाने संपत्ती निर्माण करत आहे. त्यामुळे घरांच्या मालकीसह आर्थिक क्षेत्रातील ज्येष्ठ नागरिकांचे पूर्वीचे वर्चस्व कमी होताना दिसत आहे. अमेरिकेत मागील दहा वर्षांत ज्येष्ठ नागरिकांचे सरासरी उत्पन्न तरुणांच्या तुलनेत अपेक्षित वेगाने वाढलेले नाही. ब्रिटनमध्येही ज्येष्ठ नागरिकांच्या आर्थिक स्थितीत बदल झाला आहे. ब्राझीलमध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या कुटुंबांचे सरासरी उत्पन्न कामकाजी वयोगटातील कुटुंबांच्या तुलनेत २० टक्क्यांनी कमी झाले आहे. यामागे तरुणांना मिळणाऱ्या रोजगाराच्या वाढत्या संधी हेही एक महत्त्वाचे कारण मानले जात आहे. आर्थिक सहकार्य आणि विकास संघटनेच्या (ओईसीडी) देशांमध्ये २००० ते २०१० या काळात तरुणांना तात्पुरत्या स्वरूपाच्या नोकऱ्या अधिक मिळत होत्या. मात्र, आता तरुण आणि कायमस्वरूपी नोकरी करणाऱ्यांमधील हा फरक कमी झाला आहे. त्यामुळे तरुणांना चांगल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. अनेक देश जन्मदर वाढविण्यासाठी कुटुंबांना आर्थिक मदत देत आहेत. २०२४ नंतर जर्मनी, आयर्लंड, जपान, पोलंड आणि दक्षिण कोरिया या देशांनी मुलांच्या संगोपनासाठी मिळणारी आर्थिक मदत वाढविली किंवा नव्याने सुरू केली आहे. यामुळे तरुण कुटुंबांना आर्थिक आधार देण्याचा प्रयत्न होत आहे. आर्थिक क्षेत्राप्रमाणेच राजकारणातही तरुणांचा सहभाग वाढत आहे. अमेरिका, ब्रिटन आणि फ्रान्समध्ये राजकीय नेत्यांचे सरासरी वय कमी झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे आर्थिक आणि राजकीय अशा दोन्ही क्षेत्रांत नव्या पिढीचा प्रभाव वाढत असून, ज्येष्ठ नागरिकांचे पूर्वीचे वर्चस्व बदलत असल्याचे चित्र आहे.

इन्स्टाग्राम स्टोरीच्या वादातून भालेगावात पिता-पुत्राला मारहाण

उपचारापूर्वीच वडिलांचा मृत्यू

मेहकर / प्रतिनिधी
सोशल मीडियावरील इन्स्टाग्राम स्टोरीवरून निर्माण झालेल्या वादाचे पर्यवसान मारहाणीच्या घटनेत झाल्याने मेहकर तालुक्यातील भालेगाव येथे खळबळ उडाली आहे. या घटनेत एका १६ वर्षीय विद्यार्थ्यासह त्याच्या वडिलांना मारहाण झाल्याचा आरोप असून, प्रकृती गंभीर झाल्याने रुग्णालयात नेण्यात आलेल्या वडिलांचा मृत्यू झाला. याप्रकरणी २० जणांविरुद्ध मेहकर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यापैकी १५ जणांना अटक करण्यात आली आहे. उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. भालेगाव येथील विराज निलेश निकम (वय १६) हा अमरावती येथील शासकीय पॉलिटेक्निक महाविद्यालयात प्रथम वर्षात शिक्षण घेत आहे. त्याने २ ऑक्टोबर २०२६ रोजी आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर छत्रपती शिवाजी महाराजांचा फोटो पार्श्वभूमीला ठेवून वादग्रस्त मजकूर असलेली स्टोरी पोस्ट केली होती. ही स्टोरी २४ तासांनंतर आपोआप डिलीट झाली. मात्र, या स्टोरीवरून ३ ऑक्टोबर रोजी मेहकर येथील एका युवकाने विराजला फोन करून जाब विचारल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यावेळी विराजने आपली चूक मान्य करून माफी मागितली.मात्र,मेहकरलाआल्यावर तुला दाखवतो, अशी धमकी संबंधित युवकाने दिल्याचा आरोपही करण्यात आला आहे. यानंतर १० नोव्हेंबर रोजी विराजच्या नातेवाईकांनी मेहकर येथे संबंधित युवकांची भेट घेऊन प्रकरण मिटविण्याच्या दृष्टीने समजूत काढण्याचा प्रयत्न केला. विराजनेही पुन्हा अशी चूक होणार नाही, असे सांगत माफी मागितली होती. त्याच दिवशी दुपारी एका युवकाने विराजला फोन करून यावेळी माफ करतो, यापुढे अशी चूक करू नको, असे सांगितले. मात्र, त्याच दिवशी सायंकाळी सुमारे ६ वाजताच्या दरम्यान मोटारसायकलीवरून काही युवक विराजच्या घरासमोर आले. त्यांनी विराजला घराबाहेर बोलावून



त्याच्यासह त्याचे वडील निलेश निकम यांना मारहाण केल्याचा आरोप आहे. त्यानंतर पिता-पुत्राला गावातील वाटिका परिसरात असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ नेण्यात आले. तेथे पुन्हा माफी मागण्यास सांगून दोघांनाही लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. मारहाण सुरू असताना विराजने आपल्या वडिलांच्या छातीत दुखत असल्याचे सांगून त्यांना मारहाण करू नये, अशी विनंती केल्याचे तक्रारीत नमूद आहे. मात्र, तरीही मारहाण सुरूच राहिल्याचा आरोप करण्यात आला आहे. याचवेळी विराज माफी मागत असतानाचा व्हिडिओ काही युवकांनी चित्रित केला असून, तो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी दिली. दरम्यान, याच घटनाक्रमात निलेश निकम यांना अचानक चक्कर आली आणि ते जमिनीवर बेशुद्ध पडले. घटनेची माहिती मिळताच नातेवाईकांनी त्यांना चारचाकी वाहनातून मेहकर येथील गाभणे हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर त्यांना मृत घोषित केले. वडिलांच्या अचानक झालेल्या मृत्यूमुळे विराज मानसिक धक्क्यात होता. त्याने दुसऱ्या दिवशी मेहकर पोलिसांकडे तक्रार दाखल केली. या तक्रारीत एकूण २० जणांविरुद्ध मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला असून, संबंधित मारहाणीच्या घटनेनंतरच वडिलांचा मृत्यू झाल्याचे तक्रारदाराने नमूद केले आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृत निलेश निकम यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन मेहकर ग्रामीण रुग्णालयात करण्यात आले आहे. पोलिसांनी या प्रकरणात रात्रीच तपास सुरू करून एकूण २० आरोपींपैकी १५ जणांना अटक केली असून, उर्वरित आरोपींचा शोध सुरू आहे. दरम्यान अतिरिक्त पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, उपविभागीय पोलिस अधिकारी संतोष खाडे परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. सोशल मीडियावरील एका स्टोरीवरून सुरू झालेल्या वादाला गंभीर स्वरूप प्राप्त झाल्याने भालेगावसह परिसरात या घटनेची चर्चा सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास मेहकर पोलीस निरीक्षक व्यंकटेश्वर आलेवार व कर्मचारी करीत आहेत.

थोडक्यात..

देऊळगावराजा येथील दत्तात्रय पिंपळे यांचे मरणोत्तर नेत्रदान



देऊळगावराजा / प्रतिनिधी- देऊळगाव राजा शहरातील अमृत नगर मधील रहिवासी दत्तात्रय पिंपळे यांचे दिनांक ३ नोव्हेंबर रोजी वयाचा ८३ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. मृत्यू पश्चात त्यांची मुले सोपान आणि ज्ञानेश्वर यांनी वडिलांचे मरणोत्तर नेत्रदान करण्याचा निर्णय घेतला व जायंट्स ग्रुप चे प्रमुख डॉ. अशोक काबरा व पत्रकार मधुकर रायमूल यांचे सोबत संपर्क साधला. त्यांनी जालना येथील गणपती नेत्रालयाचे चमूस बोलावून दत्तात्रय पिंपळे यांचे मरणोत्तर नेत्रदान करून घेतले. त्यांच्या कुटुंबात त्यांच्या पश्चात पत्नी, २मुले, १मुलगी, ३ भाऊ, ४ बहिणी, सुना, नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या मुलांनी घेतलेल्या नेत्रदानाच्या निर्णया मुळे या पृथ्वी तलावरील २ अंध व्यक्तींना हे सुंदर जग पाहण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

श्री रेणुका माता मंदिरातर्फे १५० महिलांना साडी-चोळीचे वाटप



खामगाव / प्रतिनिधी- समाजातील निराधार, शेतकरी व कष्टकरी महिलांप्रती आपुलकी, प्रेम आणि सामाजिक बांधिलकी जपत जुनुना येथील श्री रेणुका माता मंदिरातर्फे १५० गरजू महिलांना साडी-चोळीचे वाटप करण्यात आले. या उपक्रमातून महिलांना मदतीचा हात देण्यासोबतच समाजात सेवाभाव, सहकार्य आणि माणुसकीचा संदेश देण्यात आला. शेतात राबराब राबणाऱ्या, काबाडकष्ट करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या तसेच जीवनातील विविध अडचणींना सामोरे जाणाऱ्या महिलांच्या कष्टांची जाणीव ठेवून हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. कुटुंबाच्या सुखासाठी स्वतःच्या इच्छा-आकांक्षांना मुरड घालणाऱ्या महिलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा एक सुंदर प्रयत्न ठरला. भारतीय संस्कृतीत महिलांना आदिशक्तीचे स्वरूप मानले जाते. महिलांचा सन्मान करणे हीच खरी देवीची सेवा असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. धार्मिक कार्यासोबतच सामाजिक कार्यालाही महत्त्व देत श्री रेणुका माता मंदिराने समाजापुढे सेवाभावाचा आदर्श निर्माण केला आहे. साडी-चोळी ही केवळ वस्तूरूपातील भेट नसून त्यामागे आपुलकी, सन्मान आणि मायेची भावना दडलेली आहे. समाजातील उपेक्षित व कष्टकरी घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविणारे असे उपक्रम सामाजिक एकोपा वाढविण्यास निश्चितच महत्त्वपूर्ण ठरतात. नवरात्रोत्सवाच्या कालावधीत भाविकांकडून रेणुका मातेला साडी-चोळी अर्पण केली जाते.

डोणगाव शहरात ट्रॅफिकचा फुल्ल गोंधळ! वाहतूक राम भरोसे! गाड्या रस्त्यावर, पोलीस कुठे?

दिवाळीच्या गर्दीत वाहतुकीचा खोळंबा; नागरिकांना मनस्ताप! एका वाहतूक पोलिसावर संपूर्ण वाहतुकीचा भार





खासगी वाहनांचे रस्त्यावरच पार्किंग; नियोजनाचा अभाव!

डोणगाव / प्रतिनिधी
बुलढाणा जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर वसलेले आणि परिसरातील जवळपास ३२ गावांसाठी महत्त्वाचे संपर्क केंद्र असलेल्या डोणगावात सध्या वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर बनला आहे. वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि परिसरातील गावांमधून दररोज होणारी नागरिकांची मोठी ये-जा यामुळे डोणगावातील प्रमुख रस्त्यांवर वाहतुकीचा ताण वाढत आहे. त्यातच सध्या दिवाळीचा सण सुरू असल्याने बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होत असून वाहतूक कोंडीच्या समस्येने अक्षरशः डोके वर काढले आहे. दिवाळीची खरेदी करण्यासाठी डोणगावासह परिसरातील ३२ गावांमधून नागरिक मोठ्या संख्येने येत आहेत. वाहनांची वाढती वर्दळ पाहता वाहतूक नियंत्रणासाठी विशेष नियोजन होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात मात्र वाहतुकीचा फुल्ल गोंधळ पाहायला मिळत आहे. रस्त्यावरून मार्ग काढताना वाहनचालकांची कसरत होत असून नागरिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. एकीकडे दिवाळीचा आनंदोत्सव सुरू असताना दुसरीकडे डोणगावकर मात्र वाहतूक कोंडीच्या विळख्यात अडकले आहेत. जवळपास ३२ गावांतील नागरिकांची दररोज वर्दळ असलेल्या डोणगावात वाहतुकीचे योग्य नियोजन होणार तरी कधी? एका वाहतूक पोलिसाच्या बळावर वाढती गर्दी नियंत्रित करणे शक्य आहे का? रस्त्यांवरील अस्ताव्यस्त पार्किंगला आळा बसणार तरी कधी? असे सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. आता वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी या समस्येची गांभीर्याने दखल घेऊन डोणगावातील वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपाययोजना करावी. अन्यथा डोणगावातील वाहतुकीचा कारभार असाच 'राम भरोसे' राहणार का, हा प्रश्न अनुत्तरितच राहणार आहे! असा प्रश्न नागरिकांना आहे.

गाड्या रस्त्यावर, वाहतुकीचा खोळंबा!- डोणगावातील प्रमुख रस्त्यांवर काही खासगी वाहने रस्त्याच्या कडेला तर काही ठिकाणी थेट वाहतुकीला अडथळा होईल अशा पद्धतीने उभी केली जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे आधीच गर्दी असलेल्या रस्त्यांवर वाहतुकीचा प्रश्न अधिकच गंभीर होत आहे. अशा वाहनांना बाजूला करण्यासाठी किंवा वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी प्रभावी यंत्रणा दिसत नसल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. विशेष म्हणजे, डोणगावात सध्या एका वाहतूक पोलिसाची नेमणूक असल्याची माहिती आहे. मात्र, जवळपास ३२ गावांतील नागरिकांची वर्दळ, वाढती वाहनसंख्या आणि दिवाळीच्या काळातील अतिरिक्त गर्दी पाहता एकाच वाहतूक पोलिसावर संपूर्ण वाहतुकीचा भार कितपत पेलणार, हा प्रश्न उपस्थित होत आहे. मनुष्यबळाची मर्यादा असली तरी गर्दीच्या वेळेत अतिरिक्त पोलीस बंदोबस्त आणि योग्य वाहतूक नियोजन करणे आवश्यक आहे. त्यामुळे संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या बाबीकडे लक्ष देण्याची गरज आहे. दिवाळीच्या सणात बाजारपेठेत होणारी गर्दी लक्षात घेता वाहतूक पोलिसांची विशेष नियुक्ती आणि नियोजन अपेक्षित आहे. मात्र, गर्दीच्या वेळेत वाहतूक नियंत्रण प्रभावीपणे होत नसल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. रस्त्यावर वाहनांची गर्दी, अस्ताव्यस्त पार्किंग आणि वाहतुकीचा खोळंबा असे चित्र दिसत असल्याने वाहतूक व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वाहतूक कोंडीमुळे सर्वसामान्य नागरिक, ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यावरून सुरक्षितपणे चालणेही कठीण होत असून अपघाताचा धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. आपत्कालीन परिस्थितीत रुग्णवाहिका किंवा इतर अत्यावश्यक सेवांच्या वाहनांनाही वाहतूक कोंडीचा फटका बसू शकतो. त्यामुळे हा प्रश्न केवळ वाहतुकीपुरता मर्यादित नसून सार्वजनिक सुरक्षिततेशीही संबंधित आहे. डोणगावातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता प्रमुख चौकांमध्ये वाहतूक नियंत्रणाची व्यवस्था करणे, नो-पार्किंग क्षेत्र निश्चित करणे, रस्त्यावरील अडथळे दूर करणे आणि दिवाळीच्या गर्दीच्या काळात अतिरिक्त वाहतूक पोलिसांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. तसेच वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर नियमानुसार कारवाई होणेही गरजेचे आहे.

कारची बैलगाडीला जोरदार धडक; ७० वर्षीय शेतकऱ्याचा जागीच मृत्यू

नांदुरा / प्रतिनिधी- शेतातील काम आटोपून बैलगाडीने घरी परतणाऱ्या वृद्ध शेतकऱ्याच्या प्रवासाचा काळाने घात केला. भरधाव कारने बैलगाडीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात ७० वर्षीय शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला, तर बैलगाडीला जुंपलेले दोन्ही बैल गंभीर जखमी झाले. ही हृदयद्रावक घटना बुधवार, ११ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजेच्या सुमारास नांदुरा-मोताळा मार्गावरील लोणवडी गावाजवळ घडली. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या अपघातात वासुदेव तुळशीराम कुटे (वय अंदाजे ७० वर्षे, रा. लोणवडी) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. प्राथमिक माहितीनुसार, वासुदेव कुटे हे शेतातील काम आटोपून बैलगाडीने घराकडे परतत होते. दरम्यान, याच मार्गाने जाणाऱ्या ब्रीझा कारने त्यांच्या बैलगाडीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, बैलगाडीवरील वासुदेव कुटे यांना गंभीर मार लागल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या धडकेत बैलगाडीचेही मोठे नुकसान झाले असून, बैलगाडीला जुंपलेले दोन्ही बैल गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच नांदुरा येथील उल्हास फाउंडेशनच्या रुग्णवाहिका पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. स्वयंसेवक विलास निबोळकर, बलिराम गोड, प्रमोद वरदे, संजय चोपडे, साहेबराव फासे यांच्यासह इतरांनी मदतकार्य केले. मृतदेह नांदुरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आला.

मेहकर मतदारसंघातील लोकप्रतिनिधींच्या सामूहिक प्रयत्नांना यश, अखेर शेतीसाठी पेनटाकळीच्या पाण्याचा पैनगंगा नदीत विसर्ग सुरू

मेहकर / प्रतिनिधी
केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांचा पाठपुरावा, माजी आमदार संजय रायमुलकर यांचे उपोषण, आ. खरात यांचा पेनटाकळी प्रकल्पावर मोर्चा अशा सामूहिक प्रयत्नातून अखेर ८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पेनटाकळी प्रकल्पातून एक गेट १० सेंटीमीटरने उघडून पाण्याचा विसर्ग करण्यात आला. खरिपाची पिके वाचवण्यासाठी शेतकरी मेटाकुटीला आला असताना खूप मोठा दिलासा यामुळे मिळाला आहे. पेनटाकळी मध्यम प्रकल्पामध्ये चार दशलक्ष घनमीटर पाणी शासकीय संरक्षित पाण्यासाठी पैकी शिल्लक असल्याने ते खरिपाच्या तूर,हळद, कपाशी पिकांसाठी सोडण्यात यावे, यासाठी केंद्रीय आयुष आरोग्य,कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव,माजी आमदार संजय रायमुलकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला. अनेक बैठका यासाठी जिल्हाधिकारी यांच्या दालनात घेण्यात आल्या. ४ नोव्हेंबर रोजी पाणी सोडण्यात येणार होते परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे ते सोडण्यात आले नाही. प्रतापराव जाधव यांनी पालकमंत्री मकरंद आबा पाटील यांच्याशी आज संपर्क साधून सविस्तर चर्चा केली आणि पाणी सोडण्याचा निर्णय झाला. प्रकल्पातून पाणी सोडण्यात यावे यासाठी रायमुलकर यांनी बेमुदत उपोषण केले. आमदार सिद्धार्थ खरात यांनीही पेनटाकळी प्रकल्पावर मोर्चा काढला. अखेर सर्वांच्या सामूहिक प्रयत्नाला यश आले असून आज सायंकाळी पेनटाकळी प्रकल्प येथे विधिवत नारळ फोडून पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांच्या मार्फत एक गेट दहा सेंटिमीटरने उघडून पाण्याचा विसर्ग करण्यात आला. तीन दिवस पाणी सोडणे सुरू राहणार असून त्यातून पैनगंगा नदीवर असलेले बारा कोल्हापुरी बंधारे पूर्णपणे पाण्याने भरून राहणार आहेत. हे पाणी जवळपास दोन महिने शेतकऱ्यांना पिकांसाठी उपयोगी पडणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आता आनंद फुलला आहे. किमान १४ गावांच्या क्षेत्रातील शेतकऱ्यांना या पाण्याचा लाभ होणार आहे. रब्बीची पिके घेऊ नयेत त्या ऐवजी चाऱ्याचे बी शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे ते शेतकऱ्यांनी पेरावे तो चारा शासन हमीभावाने विकत घेणार आहे,असे आवाहन प्रतापराव जाधव यांनी केले आहे. पाणी वापर महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र गाडेकर यांनी याबद्दल शासनाचे आभार मानले आहेत. यावेळी युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव, राष्ट्रवादीचे गिरीधर ठाकरे पाटील, आमदार सिद्धार्थ खरात, चिखलीचे नगराध्यक्ष पंडितराव देशमुख, अंकुशराव पडघन, एकनाथ सास्ते, सिद्धेश्वर पवार, विलास रहाटे, ब्रह्मचारी धोंडगे, संजय वडतकर आशिष रहाटे यांच्यासह शिवसेना शिंदे पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

